-: जाहिर निविदा :-

याव्दारे आपणांस कळविणेत येते की, या न्यायालयाचे आवारात फक्त न्यायालयीन कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढणेसाठी विहीत कार्य पध्दतीचा अवलंब करून व मा. उच्च न्यायालयाच्या करारनाम्यातील अटी व शर्तींच्या अधिन राहुन नवीन झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडरचे कामासाठी अपंग व्यक्तीची किंवा इच्छुक व्यक्तींची झेरॉक्स प्रोव्हायडर म्हणुन नेमणुक करावयाची असुन त्यासाठी स्वत:ची झेरॉक्स मशीन असणे आवश्यक असुन झेरॉक्स कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

तरी वरील कामासाठी इच्छुक व्यक्तींनी किंवा मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन नं. ७४३/२०१३ अन्वये अपंग व्यक्तींना झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडर म्हणुन प्राधान्य देण्याचे असल्याने अपंग व्यक्तींनी आपले अर्ज दि.२८/०५/२०२६ अखेर ०६.०० पर्यंत या न्यायालयात सादर करावेत. तसेच अपंग व्यक्तींना प्राधान्य दिले जाणार असल्यामुळे अर्जासोबत अपंग प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडण्यात यावी.

तसेच मा. महोदयांच्या तोंडी आदेशान्वये झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडर म्हणुन नियुक्त करण्यात येणा-या व्यक्ती/फर्मकरीता झेरॉक्स आउटसोर्सिंगच्या कामासाठी ए-४ कागदाकरीता रूपये ०१-२५ पैसे, लिगल कागदाकरीता रूपये ०१-५० पैसे व ए-३ कागदाकरीता रूपये ०२-०० अशी रक्कम आकारण्यासाठी मंजुरी देणेबाबत विचाराधिन आहे. दि. २८/०५/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० नंतर येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

आज दि. १३/०५/२०२६ रोजी माझी सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केली असे.

13.05.26

जिल्हा न्यायालय, संगमनेर.
दि.१३/०५/२०२६

प्र. जिल्हा न्यायाधीश-१ व
अतिरीक्त सत्र न्यायाधीश,
संगमनेर.

प्रत :-

१. न्यायालय यांचे नोटीस बोर्ड
२. स्थानिक पातळीवरील सर्व शासकीय कार्यालये
३. स्थानिक पातळीवरील शैक्षणिक संस्था/ सेवाभावी संस्था/ बँका
४. झेरॉक्स दुकाने असलेले ठिकाण.
५. न्यायालय ई-कोर्ट प्रणाली.